अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

UPSC /MPSC /BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

प्रश्नप्रत्रिका क्रमांक **BOOKLET NO.** 202304

**2023**

**Code : YO4**

## राज्यसेवा (MPSC) पूर्व सराव परीक्षा

सामान्य अध्ययन चाचणी (GS-1)

वेळ : 2 (दोन) तास

Paper No. 4

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 200

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा - क्रंमाक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नप्रत्रिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईनेचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणारा नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रनाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नूमद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत".**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.**

### ताकीद (नमूना)

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणतयाही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम - ८२" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) **नागालँड विधानसभा** 19 **मार्च** 2022 **रोजी संपूर्ण पेपरलेस होण्यासाठी राष्ट्रीय ई - विधान ॲप लागू करणारी देशातील पहिली राज्य विधानसभा ठरली आहे.**

(ब) **नागालँड विधानासभेच्या अध्यक्षांना सभाग्रहाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यास आणि सभाग्रहाचे विधायी कामकाज पेपरलेस पद्धतीने पार पाडण्यास मदत करते.**

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ आणि ब दोन्ही अयोग्य आहेत.
2) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत.
3) फक्त अ विधान योग्य आहे.
4) फक्त ब विधान योग्य आहे.

2 **केंद्रीय रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी** 16 **मे** 2022 **रोजी नवी दिल्ली येथे भारतातील पहिली हायड्रोजन इंधन असलेली कार कोणत्या नावाने लॉंच करण्यात आली आहे.**

1) लेक्सस 2) रासा 3) ट्रॉन 4) मिराई

3 **'पंडीत शिवकुमार शर्मा' याच्याबात योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) **'पंडीत शिवकुमार शर्मा' हे भारतीय शास्त्रीय संगीतकार आणि संतुर वादक होते.**

(ब) 10 **मे** 2022 **रोजी वयाच्या** 84 **व्या वर्षी पंडीत शिवकुमार शर्मा यांचे निधन झाले होते.**

(क) **जर्नी विथ अ हंड्रेड स्ट्रिंग्ज: आणि माय लाईफ इन म्युझिक हे त्याचे आत्मचरित्र आहे.**

(ड) **'पंडीत शिवकुमार शर्मा ' यांना सन** - 1991 **साली पद्मविभुषण या पुरस्काराने गैरविले होते.**

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ,आणि क विधान / ने योग्य आहेत.
2) फक्त अ, आणि ब विधान / ने योग्य आहेत.
3) फक्त अ, ब आणि क विधान / ने योग्य आहेत.
4) फक्त अ, ब आणि ड विधान / ने योग्य आहेत.

4 **'जागतिक आरोग्य सभा — 2022' याबाबत काय खरे नाही?**

(अ) जागतिक आरोग्य सभा ही 28 मे 2022 रोजी जिनिव्हा येथे संपन्न झाली होती.

(ब) जागतिक आरोग्य सभा — 2022 ची थीम 'शांततेसाठी आरोग्य, आरोग्यासाठी शांतता'अशी होती.

(क) भारताचे आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांची जागतिक आरोग्य असेंल्लीच्या महत्वपुर्ण 'समिती — बी ' च्या अध्यक्षपदी करण्यात आली आहे.

(ड) जागतिक आरोग्य सभेसाठी 24 मे 2022 रोजी ट्रेड्रोस ॲधानोम घेब्रेयसस याची महासंचालक म्हणून नियुक्ती केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1)फक्त क विधान खरे नाही
2) फक्त ब विधान खरे नाही
3) फक्त ड विधान खरे नाही
4) फक्त अ विधान खरे नाही

5 **'आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिक कॉंग्रेस' बाबत सत्य विधान / ने सांगा?**

(अ) आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिक कॉग्रेस ची परिषद 20 ते 22 मार्च 2022 च्या दरम्यान पार पडली होती.

(ब) आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिक कॉग्रेस ची परिषद दिल्ली येथे 2022 ची संपन्न झाली.

(क) आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिक कॉग्रेस ची परिषद ही दर पाच वर्षानी आयोजित केली जाते.

(ड) आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिक कॉग्रेस ची परिषद 2022 ची थीम Geoscinces The Basic Science For a Sustainable.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान अ सत्य आहे
2) फक्त विधाने अ, क, आणि ड सत्य आहेत
3) फक्त विधाने ब, आणि क सत्य आहेत
4) फक्त विधाने अ, ब आणि ड सत्य आहेत



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

6 **हरित हायड्रोजन धोरण, 2022 ची योग्य वैशिष्ट्ये निवडा.**

(अ) फेब्रुवारी 2022 मध्ये जाहीर.

(ब) 2025 पर्यंत पाच दशलक्ष टन हरित हायड्रोजन तयार करणे.

(क) केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाने हे धोरण जाहीर केले.

(ड) केंद्र सरकारने ऑगस्ट 2021 मध्ये हायड्रोजन मिशनची घोषणा केली.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ आणि ब 2) ब आणि क

3) अ आणि ड 4) वरीलपैकी सर्व

7 **फोर्ब्सच्या जागतिक श्रीमंतांच्या यादीत 2022 मध्ये समावेश असलेल्या पहिल्या पाच व्यक्तीचा अचूक क्रम लावा?**

(अ) जेफ बेझोस (ब) वॉरेन बफेट

(क) बर्नार्ड अर्नाल्ड (ड) एलॉन मस्क

(इ) बिल गेट्स

**पर्यायी उत्तरे :**

1) अ – ड – क – ब – इ 2) ब – ड – अ – क – इ

3) ड – अ – क – इ –ब 4) अ – क – ड – ब – इ

8 **खालीलपैकी योग्य विधानांचा पर्याय निवडा.**

(अ) 2022 सालचे आयसीसी जागतिक महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने जिंकले.

(ब) आतापर्यंत सर्वाधिक महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद इंग्लंड महिला संघाने मिळविले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब

3) अ, ब दोन्ही 4) दोन्ही नाही.

9 **स्मार्ट सिटी अवॉर्ड 2022 अंतर्गत खालीलपैकी कोणत्या कंपनीला 'हरित इमारत प्रकल्प' विभागाला उत्कृष्ट पुरस्कार प्रदान करण्यात आला ?**

1) आयसीसी सिमेंट इंडिया लि. 2) फरिदाबाद स्मार्ट सिटी लि.

3) सोलिनास इंटिग्रिटी प्रायव्हेट लि. 4) देहराडून स्मार्ट सिटी लि.

10 **केंद्र शासनाने सध्या खालीलपैकी कोणत्या ईशान्य भारतातील राज्यांमधून अफ्सा कायदा काही प्रमाणात माघारी घेतला ?**

(अ) आसाम (ब) अरुणाचल प्रदेश

(क) नागालँड (ड) मणिपूर

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, क 2) ब, ड 3) अ, क, ड 4) अ, ब, ड

11 **राणी गैडिनलियू आदिवासी स्वातंत्र्य सैनिक संग्रहालय नुकतेच कोणत्या उभारण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे?**

1) मणिपुर 2) मेघालय 3) मिझोराम 4) आसाम

12 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा?**

(अ) 22 मार्च 2022 लुल्लानगर, पुणे येथे भारतीय लष्कराचा विभाग आणि महाराष्ट्र पोलिस सहाय्यक 'सुरक्षा कवच' यानावाने संयुक्त सराव आयोजित करण्यात आला.

(ब) 'सुरक्षा कवच - 2' चा मुख्य उद्देश दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करणे हा आहे.

पर्यायी उत्तरे :

1) विधान अ बरोबर आहे.

2) विधान ब बरोबर आहे.

3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत.

4) विधाने अ आणि ब दोन्ही अयोग्य आहेत.

13 **शिवांनी सिंह यांच्याबाबत काय खरे नाही?**

(अ) राफेल विमानाचे उड्डाण त्या दुसऱ्या भारतीय महिला वैमानिक ठरल्या.

(ब) त्या उत्तरप्रदेशातील वाराणसी येथील आहेत.

(क) भारतीय वायुसेनेच्या चित्ररथात सहभागी होणाऱ्या त्या दुसऱ्या महिला वैमानिक आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) अ आणि ब

14 **खालीलपैकी योग्य विधान / ने निवडा.**

(अ) 'आझादी का अमृत महोत्सव' साजरा करण्यासाठी RBI ने 25 डिजिटल बँकिंग युनिट सुरु करण्याचे जाहीर केले.

(ब) हे डिजिटल बँकिग युनिट (DBU) कमीत कमी तंत्रज्ञान सुविधांच्या साहाय्याने डिजिटल बँकिंगच्या सेवा व उत्पादने पुरविता.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब
3) अ, ब दोन्ही 4) यापैकी नाही

15 **खालील विधाने विचारात घ्या.**

(अ) भारत आणि जपान या देशांदरम्यान 'लिमितेय - 2022' हा सैन्य युद्व प्रशिक्षण सराव पार पडला.

(ब) राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयामार्फत 'नॅशनल सायबर सिक्युरिटी एक्सरसाइस' आयोजित केला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ योग्य 2) फक्त ब योग्य
3) अ, ब दोन्ही योग्य 4) कोणतेही योग्य नाही

16 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राज्यांचे राज्यसभेतील प्रतिनिधी राज्य विधान सभेतील आणि विधान परिषदेतील निर्वाचित सदस्य निवडतात.

(ब) राज्यसभेच्या सदस्यांची निवडणूक प्रमाणीर प्रतिनिधित्व पद्धतीने एकल संक्रमणीय मतदान तत्वानुसार होते.

(क) अमेरिकेत मात्र लोकसंख्या कितीही असली तरी सिनेटमध्ये प्रत्येक राजयाचे दोन याप्रमाणे 50 राज्याचे 100 सदस्य असातात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत.
2) फक्त विधाने ब आणि क योग्य आहेत.
3) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.
4) फक्त ब तरतुद योग्य आहे.

17 **भारतीय राज्यघटनेत कलम - 51 (अ) मध्ये मूलभूत कर्तव्यांची यादी दिलेली आहे. त्यापैकी काही महत्वाची मूलभूत कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत. घटनेत दिलेल्या यादीनुसार त्यांचा योग्य क्रम ठरवा.**

(अ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशांचे मोल जाणून तो जतन करणे.

(ब) देशांचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

(क) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

(ड) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, ड, क 2) ब, अ, ड, क
3) अ, ब, क, ड 4) ब, अ, क, ड

18 **पुढील विधानांचा विचार करुन अचूक विधान ओळखा.**

(अ) भारताचे राज्यक्षेत्र यामध्ये केवळ घटकराज्यांचा समावेश होतो.

(ब) भारताचा संघ यामध्ये घटकराज्यांबरोबर केंद्रशासित प्रदेश आणि भविष्यात संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे यांचाही समावेश होतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) दोन्हीही 2) फक्त अ 3) फक्त ब 4) दोन्ही नाही.

19 **पुढील विधानांचा विचार करुन बरोबर नसलेल्या विधानांची निवड करा.**

(अ) घटनेच्या कलम - 368 अंतर्गत प्रास्ताविकेत सुधारणा करता येऊ शकते का, हा मुद्दा सर्वप्रथम केशवानंद भारती केस मध्ये निर्माण झाला.

(ब) सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की, प्रास्ताविका घटनेचा भाग नसल्याने तिच्यामध्ये सुधारणा करता येणार नाही.

(क) प्रास्ताविकेत आतापर्यंत केवळ दोनदाच सुधारणा करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ब आणि क 2) फक्त अ आणि क 3) फक्त अ आणि ब 4) वरीलपैकी सर्व

20 **खालील विधानांचा विचार करुन योग्य पर्याय निवडा.**

(अ) कायदा करण्याची पद्धत ही तरतूद भारताने ब्रिटिश घटनेवरून घेतली आहे.

(ब) कायद्याने प्रस्थापित पद्धत ही तरतूद भारताने जपानच्या घटनेवरून घेतली आहे.

(क) कायद्याचे राज्य ही तरतुद भारताने कॅनडाच्या घटनेवरून घेतली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब 2) फक्त अ आणि क 3) फक्त ब आणि क 4) वरीलपैकी सर्व

21 **कलम - 22 मध्ये आढळणारा / असणारा मुलभूत हक्क कोणता?**

1) अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण 2) माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई

3) जिवित व व्यक्तीगत स्वातंत्र यांचे संरक्षण 4) कारखाने, इ. मध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई.

22 **संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या सुधारणा / दुरुस्ती करता येते ?**

(अ) नवीन राज्यांची स्थापना (ब) संसदेची गणसंख्या

(क) संसदेत इंग्रजीचा वापर (ड) नागरिकत्व

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) वरीलपैकी सर्व 4) फक्त क व ड

23 **राष्ट्रपतींच्या क्षमादानासंबंधीत पुढील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राष्ट्रपतींच्या क्षमादानाचा अधिकार हा एक कार्यकारी अधिकार आहे.

(ब) हा अधिकार न्याय व्यवस्थेपासून स्वतंत्र आहे.

(क) या अधिकाराचा वापर करतांना राष्ट्रपती अपिलाचे न्यायालय म्हणून कार्य करते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) फक्त अ आणि ब पर्याय

24 **खालील विधाने अभ्यासून योग्य पर्याय निवडा.**

(अ) पंतप्रधानांची निवड करण्यासाठी राष्ट्रपती आपला वैयक्तिक स्वेच्छेधिकार वापरु शकतो.

(ब) पंतप्रधान हा 'शासन प्रमुख' असतो.

(क) पंतप्रधानांनी राष्ट्रपतीला एखाद्या मंत्र्याला पदावरुन दूर करण्याचा सल्ला दिल्यास राष्ट्रपतींना तो पाळावाच लागतो.

(ड) जवाहरलाल नेहरु व इंदिरा गांधी यांच्या मृत्यूनंतर गुलजारीलाल नंदा यांनी काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम केले.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ड बरोबर 2) फक्त ड चूक 3) ब आणि ड चूक 4) ब, क, ड बरोबर

25 **खालील पैकी योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) कलम - 352 नुसार आणिबाणींची उदघोषणा केली जाते.

(ब) सर्वप्रथम भारतात आणिबाणीची उदघोषणा 1962 मध्ये करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि दोन्ही 4) वरीलपैकी सर्व

26 **पुढीलपैकी कोणते विधान अयोग्य नाही ?**

(अ) लोकशाही आणि विकास यासाठी पंचायतराज संस्थांच्या मजबुतीसाठी सिंघवी समिती नेमली गेली.

(ब) एल.एम. सिंघवी समिती 1986 मध्ये नेमली गेली.

(क) राजीव गांधी पंतप्रधान नसताना ही समिती नेमली गेली.

(ड) सिंघवी समितीच्या शिफारशीनुसार पुढे 73 वी घटनादुरुस्ती झाली.

(इ) एल. एम. सिंघवी समितीच्या शिफारशीनुसार पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठी राजीव गांधी सरकारने 64 वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क, ड 2) अ, ब, ड, इ 3) अ, ड, इ 4) ब, क, ड, इ

27 **पुढील विधाने अभ्यासून योग्य पर्याय निवडा.**

(अ) वसंतराव नाईक यांच्या समितीच्या शिफारसीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 संमत करण्यात आला.

(ब) वसंतराव नाईक समितीच्या आधी महाराष्ट्रात लोकल बोर्ड, जिल्हा स्कूल बोर्ड या नावाने जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद ही शासन व्यवस्थां अस्तित्वात होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ योग्य 2) फक्त ब योग्य 3) अ आणि ब दोन्ही योग्य 4) अ आणि ब दोन्ही अयोग्य

28 **पंचायत राज्याच्या क्षेत्रात 73 व्या घटनादुरुसतीद्वारे खालीलपैकी कोणती तरतूद सुचविलेली नाही ?**

(अ) महिला उमेदवाराला सर्व स्तरावर 1 / 3 आरक्षण (ब) राज्याने वित्त आयोगाची स्थापना करावी

(क) निर्वाचित पदाधिकाऱ्यांना जर 2 पेक्षा जास्त अपत्ये असतील तर ते आपल्या पदावर राहण्यास अपात्र ठरतील.

(ड) पंचायत राज संस्था जर विसर्जित झाल्या तर सहा महिन्यांच्या कालावधीत निवडणूका झाल्या पाहिजेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ पर्याय 2) फक्त ब पर्याय 3) फक्त ड पर्याय 4) फक्त क पर्याय

29 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) ग्रामसभेने सभेत किमान 2 / 3 एकूण मतदार / एकूण महिला मतदार उपस्थित राहुन गावातील दारुविक्रीची दुकाने बंद करण्याचा ठराव विशेष बहुमताने पारित केल्यास जिल्हाधिकारी तेथील दारुचे परवाने रद्द करतात.

(ब) ग्रामसभा दारुविक्री बंद करण्यासंदर्भात ठराव पारित करु शकली नाही तर, ग्रामसभेला 1 वर्ष तसा ठराव मांडता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ योग्य 2) फक्त ब योग्य 3) अ आणि ब दोन्ही योग्य 4) अ आणि ब दोन्ही अयोग्य

30 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) महाराष्ट्र विधीमंडळाने 6 सप्टेंबर 1973 रोजी पंचायत राज समिती स्थापना करण्यात आली.

(ब) या पंचायत राज समितीमध्ये 25 सदस्य असतात.

(क) जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून न तो निधी मंजूर करण्यात आला आहे त्यांचा अहवाल तपासणे व जिल्हा परिषद च्या कार्यक्रम अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचे कार्य ही समिती करते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ योग्य 2) अ आणि ब योग्य 3) अ आणि क योग्य 4) वरील सर्व

31 **भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये खालीलपैकी अचूक विधान कोणते?**

(अ) ग्राहक हे सार्वभौम नसतात.

(ब) वस्तू व सेवांचे उत्पादन वैयक्तिक नफ्यासाठी होत नाही.

(क) बाजारपेठेत स्पर्धेचे प्राबल्य नसते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त अ आणि क 4) वरीलपैकी नाही

32 **खालील विधानांचा विचार करुन कोणते विधान / ने बरोबर नाही?**

(अ) जानेवारी 2000 मध्ये डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय सांख्यिकीय आयोग' स्थापन करण्यात आला.

(ब) 12 जुलै, 2006 रोजी कायमस्वरूपी 'राष्ट्रीय सांख्यिकिय आयोग'ची स्थापना प्रो. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

(क) 15 जुलै 2021 पासून प्रो. विमल कुमार रॉय हे 'राष्ट्रीय सांख्यिकीय आयोग'चे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) कोणतेही नाही 2) ब आणि क 3) अ, ब आणि क 4) अ आणि ब

33 **'बहु आयामी दारिद्रय निर्देशांक' खालीलपैकी कोणत्या आयामांद्वारे काढला जात नाही ?**

(अ) आरोग्य (ब) श्रम बाजार (क) सबलीकरण (ड) शिक्षण

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ब आणि क 2) फक्त अ आणि ड 3) फक्त अ आणि क 4) कोणतेही नाही

34 **खालीलपैकी कोणत्या योजनेची उद्दिष्ट्ये ही स्वावलंबन, सामाजिक न्यायासह आर्थिक वाढ आणि समतोल प्रादेशिक विकास ही होती?**

1) दुसरी पंचवार्षिक योजना 2) तिसरी पंचवार्षिक योजना 3) चौथी पंचवार्षिक योजना 4) पाचवी पंचवार्षिक योजना

35 **खालील विधानांचा विचार करुन कोणते विधान अयोग्य नाही ?**

(अ) कार्यशक्ती = श्रमशक्तीपैकी प्रत्यक्ष रोजगारात गुंतलेल्या व्यक्तींची संख्या.

(ब) कामगार लोकसंख्या प्रमाण = एकूण लोकसंख्येपैकी (15 +) प्रत्यक्ष रोजगारी / कामगार व्यक्तींचे हजारी प्रमाण.

(क) बेरोजगारी दर = श्रमशक्तीपैकी कामासाठी उपलब्ध असलेल्या मात्र रोजगार प्राप्त न झालेल्या व्यक्तींचे हजारी प्रमाण.

(ड) बेरोजगार प्रमाण = एकूण लोकसंख्येपैकी (15 +) बेरोजगार व्यक्तींचे हजारी प्रमाण.

**पर्यायी उत्तरे :**

1) ब, ड, अ 2) वरील सर्व 3) क, अ, ड 4) फक्त अ

36 **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रकल्पांची निवड, अंमलबजावणी आणि पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी कोणाची असते ?**

1) ग्रामसेवक 2) सरपंच 3) ग्रामसभा 4) ग्रामपंचायत

37 **2011 च्या लोकसंख्येच्या घनतेनुसार भारतातील राज्ये / केंद्रशासीत प्रदेशांच्या बाबतीत पुढील विधानांचा विचार करा व योग्य पर्याय निवडा.**

(अ) 100 पेक्षा कमी घनता असलेली एकूण 4 राज्ये / कें. प्र. आहेत.

(ब) 101 ते 500 घनता असलेली एकूण 19 राज्ये / कें. प्र. आहेत.

(क) 501 ते 1000 घनता असलेली एकूण 5 राज्ये / कें. प्र. आहेत.

(ड) 1000 घनता असलेली एकूण 7 राज्ये / कें. प्र. आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि क 2) फक्त ब आणि ड 3) फक्त अ, ब आणि क 4) वरीलपैकी सर्व

38 **रिझर्व्ह बँकेने ------- साली व्यापारी बँकांना बँक साधी / बिझीनेस करस्पाँडंट योजना सुरु करण्याची संमती दिली.**

1) 2004 2) 2006 3) 2008 4) 2009

39 **पुढील विधानांचा विचार करुन कोणते विधान खरे नाहीत ?**

(अ) भारतावरील अंतर्गत कर्जाचे प्रमाण 1980 - 81 मध्ये जीडीपीच्या 24 टक्के होते.

(ब) 1990 - 91 मध्ये ते 40 टक्के एवढे झाले.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ अ 2) केवळ ब 3) वरील दोन्ही 4) कोणतेही नाही

40 **खाजगीकरणाच्या प्रक्रियेत पुढीलपैकी कशाचा समावेश होतो ?**

(अ) सार्वजनिक क्षेत्रातील आरक्षित क्षेत्रे खाजगी क्षेत्रास खुली करणे.

(ब) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील मालकीचे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरण करणे.

(क) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीचे हस्तांतरण न करता केवळ त्यांच्या व्यवस्थापनात व नियांत्रणात खाजगी क्षेत्रास सहभागी करून घेणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त अ आणि क 4) वरील सर्व

41 **खाजगीकरणाच्या प्रक्रियेत पुढील प्रकारांचा समावेश केला जातो. खालील अचूक नसलेली विधाने ओळखा ?**

(अ) सार्वजनिक क्षेत्रास आरक्षित क्षेत्रे खाजगी क्षेत्रे खुली करते.

(ब) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील मालकीचे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरण करणे.

(क) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीचे हस्तांतरण न करता केवळ त्यांच्या व्यवस्थापनात व नियंत्रणात खाजगी क्षेत्रास सहभागी करुन होणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब 2) फक्त अ आणि क 3) अ, ब आणि क तिन्ही 4) कोणतेही नाही

42 **1 एप्रिल 2017 पासून स्टेट बँकेच्या 5 सहयोगी बँका व भारतीय महिला बँकेच्या विलिनीकरणासंदर्भात पुढील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने कोणते ?**

(अ) विलिनीकरण झाल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया हे जगातील टॉप 20 बँकांच्या यादीत प्रविष्ट होणार आहे.

(ब) विलिनीकरणानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सुमारे 22500 शाखा तर 58000 ए.टी.एम. उपलब्ध होणार आहेत.

(क) विलिनीकरणानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाची एकूण मालमत्ता 37 लाख कोटी रुपयांवर पोहोचणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) वरीलपैकी सर्व 4) फक्त अ

43 **बँकांची बँक म्हणून RBI पुढीलपैकी कोणते / ती कार्ये करते ?**

(अ) बँकांच्या रोख राखीव निधीचा सांभाळ करणे.

(ब) बँकांना कर्जे व अग्निमे देणे.

(क) बँकांची अंतिम ऋणदाता म्हणून कार्य करणे.

(ड) आंतर बँक व्यवहाराची पुर्तता करणार केंद्र म्हणून कार्य करणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) वरीलपैकी सर्व 2) फक्त अ आणि क 3) फक्त अ आणि क 4) फक्त अ, ब आणि क

44 **भारतीय प्रतिभूती व विनिमय महामंडळाबद्दल चुकीची नसलेली विधाने ओळखा.**

(अ) जी.एस. पटेल समितीच्या शिफारशीनुसार SEBI ची स्थापना झाली.

(ब) सुरवातीला ती वैधानिक संस्था म्हणून कार्यरत होती, परंतु नंतर कंपनी कायदा 1956 अंतर्गत तिचे Public Limited Co. मध्ये रुपांतर केले.

(क) सेबीचे मुख्यालय दिल्ली येथे असून, कोलकत्ता व चेन्नईला तिचे विभागीय कार्यलये आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि क 2) फक्त ब आणि क 3) फक्त क 4) फक्त अ

45 **राष्ट्रीय कृषी विस्तार व व्यवस्थापन संस्थेचे मुख्यालय पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी आहे ?**

1) हैदराबाद 2) मुंबई 3) नवी दिल्ली 4) भोपाळ

46 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राजा कनिष्काच्या दरबारात संरक्षण प्राप्त विद्वान अश्वघोष असून तो ख्रिश्चन तत्वज्ञ होता.

(ब) राजा कनिष्काच्या दरबारात संरक्षण प्राप्त विद्वान नागार्जून याची तुलना मार्टिन लुथर सोबत केली जाते.

(क) वसुमित्र हा राजा कनिष्कचा मंत्री होता.

(ड) 'मथुरा' यांनी राजा कनिष्काच्या दरबारात 'महाविभाषाशास्त्र' हा ग्रंथ लिहला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ आणि ड दोन्ही योग्य आहेत. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

47 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) सिंधु संस्कृती ही एक ग्रामीण संस्कृती असून वैदिक संस्कृती ही एक नगरीय संस्कृती आहे.
(ब) वैदिक संस्कृती ही आर्य संस्कृती म्हणून ओळखली जात असून 'आर्येत्तर संस्कृती' म्हणून सिंधू संस्कृतीची ओळख आहे.
(क) सिंधु संस्कृतीत गाईला पवित्र व विशेष पूजनीय मानता होते.
(ड) वैदिक संस्कृतीत बैलाला पवित्र व विशेष पुजनीय मानत होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 2) विधाने अ आणि क दोन्ही योग्य आहेत.
3) विधाने ब आणि ड दोन्ही योग्य आहेत. 4) फक्त अ विधान योग्य आहे.

48 **खालील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) सिंधू संस्कृती मध्ये बहुतांश प्रत्येक घरात आडांचा व्यास हा 5 ते 7 फुटापर्यंत असायचा.
(ब) सिंधु संस्कृतीत 2.5 फुटाच्या नाल्या होत्या.
(क) सिंधु संस्कृतीत प्रमुख दोन राजधान्या असून 'हडप्पा' हे सिंधु तटावर वसले होते, तर 'मोहेनजोदडो' हे रावी तटावर वसले होते.
(ड) सिंधु संस्कृतीत गुजरात मध्ये 'लोथल' येथून सागरी व्यापारासाठी तयार करण्यात आलेली कृत्रिम गोदी तयार करण्यात आली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ, ब आणि क असत्य आहेत. 2) फक्त विधाने अ आणि क असत्य आहेत.
3) फक्त विधाने अ आणि ब असत्य आहेत. 4) फक्त विधाने ब आणि ड असत्य आहेत.

49 **जैन धर्मातील 'पंच महाव्रते' याबाबत योग्य जोड्या लावा.**

| | गट अ | | गट ब |
|---|---|---|---|
| अ) | सत्य | i) | निष्काम आचरणाची प्रवृत्ती |
| ब) | अस्तेय | ii) | कर्म आणि वचनात सत्यता. |
| क) | अपरिग्रह | iii) | अनावश्यक संग्रह निषिद्ध |
| ड) | ब्रह्माचार्य | iv) | इतरांच्या वसतुच्या छळकपट व लोभाने कोणत्याही रुपात स्वीकार न करणे. |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iii | ii | i | iv |
| 2) | iv | iii | ii | i |
| 3) | ii | iv | iii | i |
| 4) | i | ii | iii | iv |

50 **खालीलपैकी मध्ययुगीन काळात कोणाला 'अचाट कल्पनांचा पुरुष' म्हणून संबोधले जाते असे.**

1) बल्बन गुलाम 2) महंमद बिन तुघलक 3) अल्लाउद्दीन खिलजी 4) गियासउद्दीन तुघलकशाह

51 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) बहामनी राज्याच्या पाच शाह्यांपैकी विजापूरची आदिलशाही हे स्वतंत्र राज्य म्हणून सन 1489 मध्ये युसुफ आदिलशाहने घोषित केले होते.
(ब) सन 1518 साली कुली कुतुबशाहने राजधानी गुलबर्गा येथून गोवळ कोंड्याला आणली होती.
(क) बिदरची बरीदशाही सचन 1619 साली विजापूरच्या आदिलशाही या साम्राज्यात विलीन झाले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) अ आणि ब विधाने योग्य आहे.
3) सर्व विधाने योग्य आहेत. 4) ब आणि क विधाने योग्य आहे.

52 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) छ. राजाराम महाराज यांनी प्रल्हाद निराजी आणि खंडो बल्लाळ या सहकाऱ्या सोबत कर्नाटकातील जिंजी येथे 26 सप्टेंबर 1689 रोजी प्रयाण केले होते.
(ब) झुल्फिकारखानने 3 नोव्हेंबर 1689 साली महाराणी येसुबाई आणि युवराज शाहू महाराज यांना कैद केले होते.
(क) कर्नाटक मोहिमेमध्ये संताजीने इस्लाईलखान यास व धनाजीने अलीमर्दानखान यास पकडून जिंजी येथे आणले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) ब आणि क विधाने योग्य आहे.

3) अ आणि ड विधाने योग्य आहे. 4) अ आणि ब विधाने योग्य आहे.

53 **खालील विधांनाचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) जेम्स ओट्म आणि डब्लू. टेलर यांनी 1857 च्या उठावाला 'हिंदू - मुस्लमान' कारस्थानचा परिणाम असे म्हटले आहे.

(ब) बेंजामिन डिझरायली यांनी 1857 च्या उठावाला 'राष्ट्रीय उत्थान' असे म्हटले होते.

(क) वि.दा. सावरकर यांनी 1909 साली लंडन येथे प्रकाशित केलेल्या 'The Indian War of Independence' या पुस्तकात 1857 च्या उठावाचा उल्लेख 'भारतीय स्वातंत्र्यासाठी योजना बद्ध संघर्ष' असा उल्लेख केला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ आणि क सत्य आहेत. 2) वरील सर्व विधाने सत्य आहेत.

3) विधाने अ आणि ब सत्य आहेत. 4) फक्त अ विधान सत्य आहेत.

54 **'सार्जंट योजना' याबाबत असत्य विधान / ने ओळखा.**

(अ) सन 1944 मध्ये केंद्रिय सल्लागार मंडळाने राष्ट्रीय शिक्षणाची एक योजना तयार केली त्यास सार्जंट योजना असे म्हणतात.

(ब) जॉन सार्जंट हे भारत सरकारचे तत्कालीन शिक्षणमंत्री होते.

(क) 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोठ्या प्रमाणात निशु:ल्क अनिवार्य शिक्षण देण्याची तरतुद या योजनेत होती.

(ड) 14 ते 21 वयोगटातील 7 वर्षाची वेगळी शिक्षण पद्धती भारतात रुज करण्यात आली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने ब, क आणि ड असत्य आहेत. 2) फक्त विधाने ब आणि ड असत्य आहेत.

3) फक्त विधाने अ, क आणि ड असत्य आहेत. 4) वरीलपैकी सर्व

55 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) डिसेंबर 1883 साली आनंद मोहन बोस यांच्या अध्यक्षतेखाली इंडियन नॅशनल कॉन्फरन्सची अधिवेशन बोलावण्यात आली होती.

(ब) सन 1985 साली ऐन नाताळच्या महिन्यात नॅशनल कॉन्फरन्सचे दुसरे अधिवेशन बोलावण्यात आले होते.

(क) सन 1985 साली बोलावलेले नॅशनल कॉन्फरन्सचे दुसरे अधिवेशन केवळ राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेमुळे झाले नाही.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने ब आणि क योग्य आहेत.

2) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत.

3) वरील सर्व पर्याय योग्य आहेत.

4) फक्त ब पर्याय योग्य आहेत.

56 **'गदर चळवळ' या बाबत अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'लाला हरदयाळ' यांनी 1 नोव्हेंबर 1915 साली अमेरिकेतील सॅनफ्रांसिको शहरात गदर पक्षाची स्थापना केली होती.

(ब) लाला हरदयाळ यांना गणेश वसुदेव पिंगळे आणि रामचंद्र यांनी गदर चळवळीत सहकार्य केले होते.

(क) गदर पक्षातर्फे 'गदर' नावाचे साप्ताहिक 1857 च्या उठावाच्या स्मृतीप्रित्यर्थ चालविले जात होते.

(ड) लाला हरदयाळ यांनी जपानमधील हिरोशिमा येथे 'भारत स्वातंत्र्य समिती' ची स्थापना केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, ब आणि क विधाने असत्य आहेत.

2) फक्त अ, ब आणि ड विधाने असत्य आहेत.

3) फक्त अ आणि ड विधाने असत्य आहेत.

4) वरीलपैकी सर्व

57 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या व्यक्तीमत्वावर 'चित्तरंजन दास' याचा प्रभाव होता.

(ब) सन 1924 साली चित्तरंजन दास कलकत्ता महानगर पालिकेचे महापौर तर सुभाषचंद्र बोस महानगर पालिकेचे आयुक्त बनले होते.

(क) नेताजी सुभाषचंद्र बोस सिंगापूरहून जपानकडे निघाले असता 18 ऑगस्ट 1945 रोजी त्यांच्या विमान आपघातात मृत्यू झाला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत.

2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.

3) फक्त विधान अ योग्य आहेत.

4) फक्त विधाने ब योग्य आहेत.



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

58 **न्यू इंग्लिश स्कुल पुणे चे संस्थापक सदस्य कोण होते ?**

(अ) लोकमान्य टिळक

(ब) गोपाळ गणेश आगरकर

(क) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(ड) दादोबा पांडुरंग तर्खडकर

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) फक्त 2) (अ) आणि (ब) फक्त

3) (अ), (ब) आणि (क) फक्त 4) वरील सर्व

59 **धोंडो केशव कर्वेबाबत कोणती विधाने सत्य आहेत.**

(अ) त्यांच्या प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी एका 23 वर्षीय विधवेशी विवाह केला.

(ब) सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या व पैशाची अपेक्षा नसणाऱ्या कार्यकर्त्यासाठी त्यांनी निष्काम कर्ममठ स्थापन केला.

(क) ते 1915 सालच्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) (ब) आणि (क) सत्य आहेत, (अ) सत्य नाही.

2) (अ) आणि (क) सत्य आहेत, (ब) सत्य नाही.

3) (अ) आणि (ब) सत्य आहेत, (क) सत्य नाही.

4) वरील सर्व सत्य आहे.

60 **राजर्षी शाहू महाराजांच्याबाबत पुढीलपैकी कोणती विधाने सत्य आहे ?**

(अ) त्यांनी 1910 मध्ये सहकारी सोसायट्यांचा कायदा केला.

(ब) 1916 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा संमत केला.

(क) त्यांनी 1918 मध्ये आंतरजातीय विवाह कायदा संमत केला.

(ड) त्यांनी 1906 मध्ये सत्यशोधक परिषद आयोजित केली.

**पर्यायी उत्तरे :**

1) वरील सर्व विधाने सत्य आहेत.

2) केवळ विधाने (अ), (ब) आणि (क) सत्य आहेत.

3) केवळ विधाने (ब) आणि (क) सत्य आहेत.

4) केवळ विधाने (अ) आणि (ड) सत्य आहेत.

61 **जलविद्राव्य जीवनसत्वांसंबंधी पुढील विधानांचा विचार करुन योग्य पर्याय निवडा.**

(अ) यांचा शरीराला सतत पुरवठा होणे गरजेचे असते.

(ब) ही जीवनसत्वे लघवी, घाम यातील पाण्याबरोबर शरीराबाहेर टाकली जातात.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ व ब बरोबर असून विधान अ हे विधान अ चे समर्थक कारण आहे.

2) विधाने अ व ब बरोबर असून विधान ब हे विधान अ चे समर्थक कारण आहे.

3) विधान अ बरोबर, विधान ब चूक.

4) विधान अ चूक, विधान ब बरोबर.

62 **'इंटरफेरॉन' संबंधीत पुढील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) हा छोट्या आकाराचा प्रथिनांचा गट आहे.

(ब) याचा उपयोग विषाणुजन्य रोगांच्या उपचारासाठी केला जातो.

(क) याची निर्मिती रक्तात मॅक्रोफेजेस व काही प्रमाणात WBCs द्वारे होते.

(ड) मात्र आता जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने जनुकीयदृष्ट्या उन्नत विषाणूचा वापर करून निर्माण केला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

1) वरील सर्व 2) फक्त अ आणि ब 3) फक्त अ, ब आणि क 4) फक्त ब, क आणि ड

63 **केशवाहिन्यांसंबंधित खालील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) या सर्वात पातळ रक्तवाहिन्या असतात.

(ब) या शिरांच्या विभागणी व पुनर्विभागणीमुळे तयार होतात.

(क) केशवाहिन्या एकत्र येऊन धमनिका तयार करतात.

**पर्यायी उत्तरे :**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1) अ आणि ब 2) अ आणि क 3) ब आणि क 4) वरील सर्व

64 **मानवी वृक्कां संबंधित पुढे काही विधाने दिली आहेत, त्यांमधुन चुकीचे विधाने ओळखा.**

(अ) याची लांबी साधारणत: 10 Cm असते.

(ब) याची रुंदी साधारणत: 5 Cm असते.

(क) याची जाडी साधारणत: 4 Cm असते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त अ आणि ब

3) फक्त अ आणि क 4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

65 **पुढीलपैकी कोणते भाग / अंग चेतापेशीचे आहेत ते ओळखा.**

(अ) वृक्षिका (ब) पेशीकाय

(क) अक्षतंतू (ड) 'श्वान'ची पेशी

(इ) रॅन्वीअरचा संकोच (फ) मायलीन आवरण

(ग) बोमन्स संपुट

**पर्यायी उत्तरे :**

1) ग सोडून इतर सर्व 2) ड सोडून इतर सर्व

3) इ, फ सोडून इतर सर्व 4) ड, इ, सोडून इतर सर्व

66 **खालील विधानांचा विचार करुन असत्य विधान / ने ओळखा.**

(अ) चाळणनलिका मधील पेशी जिवंत असतात परंतु त्यांना केंद्रक नसतात.

(ब) सहपेशी मधील पेशी मृत असतात.

(क) सहपेशीतील केंद्रक आकाराने मोठा असतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ब 2) फक्त अ आणि ब 3) फक्त ब, क 4) वरील सर्व

67 **केंद्रकीय अभिक्रियांच्या संबंधीत अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) केंद्रकीय अभिक्रिया ऊर्जा संवर्धनाचा नियमाचे पालन करते.

(ब) केंद्रकीय अभिक्रिया संवेग संवर्धनाचा नियमाचे पालन करते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब 4) दोन्हीही नाही.

68 **बंदुकीने गोळी झाडली असता पुढीलपैकी कोणत्या क्रिया घडतात?**

(अ) बंदुकीचा संवेग व गोळीचा संवेग यांचे परिमाण वेगवेगळे असतात.

(ब) बंदुकीचा संवेग व गोळीचा संवेग यांचे परिमाण सारखे असते.

(क) बंदुकीचा संवेग व गोळीचा संवेग यांची दिशा सारखीच असते.

(ड) तेथे संवेग स्थिर असतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, क आणि इ 2) फक्त ड, इ 3) फक्त ब, ड आणि इ 4) फक्त अ, ड आणि इ

69 **जर प्लावक बल वस्तूच्या वजनापेक्षा जास्त असेल तर -------**

1) वस्तू तरंगते 2) वस्तू बुडते 3) वस्तू द्रवामध्ये तरंगत राहते. 4) वरीलपैकी कोणतेही नाही.

70 **खालील विधानांचा विचार करुन सत्य विधान / ने ओळखा.**

(अ) ध्वनीलहरींचे सपाट पृष्ठभागावरून परावर्तन होताना त्यांच्या लहरींच्या स्वाभावात कोणताही बदल होत नाही.

(ब) ध्वनी लहरींचे परावर्तनाचे नियम प्रकाश लहरी प्रमाणेच असतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्हीही 4) दोन्हीही नाही

71 **10Ω, 20 Ω आणि 60 Ω चे रोध समांतर जोडणीत जोडले असून त्यांच्या दोन टोकात 25 V विभावांतर प्रयुक्त केले आहे, र परिपथातून वाहणारी एकूण विद्युतधारा किती ?**

1) 4A 2) 8A 3) 12A 4) 24A

72 **पुढील वर्णन कोणत्या सिद्धांताचे / प्रारुपाचे आहे ?**

(अ) द्रव्य अविभाज्य अणुंपासून बनला आहे.

(ब) एका मूलद्रव्याचे सर्व अणू एकसमान असतात.

(क) वेगवेगळ्या मूलद्रव्यांच्या अणूंच्या निश्चित संयोगापासून संयुगे तयार होतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) डाल्टनचा अणुसिद्धांत
2) थॉमसनचे प्लम पुडिंग अणुप्रारुप
3) रुदरफोर्डचे केंद्रकीय अणुप्रारुप
4) वरीलपैकी एकही नाही.

73 **रासायनिक अभिक्रियेत उत्प्रेरकाच्या उपस्थितीत काय घडते ?**

(अ) रासायनिक अभिक्रियेचा दर बदलतो.

(ब) उत्प्रेरकामध्ये रासायनिक बदल होतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ब 2) फक्त अ 3) अ आणि ब 4) वरील दोन्हीही नाही

74 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) धातूचा स्वभाव electropositive असतो.

(ब) अधातूचा स्वभाव electronegative असतो.

(क) धातूंच्या संयुजा कवचात (valence shell) 1 किंवा 2 किंवा 3 इलेक्ट्रॉन असतात.

(ड) अधातूंच्या संयुजा कवचात (valence shell) 5 किंवा 6 किंवा 7 इलेक्ट्रॉन असतात.

(इ) धातू त्यांचे संयुजा इलेक्ट्रॉन (valence electron) गमावतून धनआयान (कॅटायन) निर्माण करतात.

(फ) अधातू त्यांच्या संयुजा कवचात (valence shell) इलेक्ट्रॉन स्वीकारुन ऋण आयन (ॲनायन) निर्माण करतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, क, इ 2) फक्त ब, ड, फ 3) फक्त् अ, ब, इ, फ 4) वरील सर्व

75 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखे.**

(अ) जेव्हा कार्बन किंवा हायड्रोकार्बनला $O_2$ च्या मर्यादित पुरवठ्यामध्ये ज्वलन केले जाते तेव्हा $CO_2$ तयार होतो.

(ब) जेव्हा कार्बनयुक्त पदार्थाला $O_2$ च्या अतिरिक्त पुरवठ्यामध्ये ज्वलन केले जाते तेव्हा CO तयार होतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब 4) दोन्हीही नाही

76 **'शिवालिक टेकड्या' या बाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) हिमालय पर्वताच्या सर्वात उत्तरेकडील रांगा म्हणून 'शिवालिक टेकड्या' ओळखाल्या जातात.

(ब) शिवालिक टेकड्या सर्वात अर्वाचीन टेकड्या आहेत.

(क) शिवालिक टेकड्यांची उंची 800 ते 1200 मीटर असून त्यांची एकूण लांबी 2600 मीटर आहे.

(ड) शिवालिक टेकड्यांच्या पायथ्यांशी असलेल्या दऱ्यांना 'डून' म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत.
2) फक्त अ आणि ड विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि क विधाने योग्य आहेत.
4) वरीलपैकी सर्व

77 **भारतातील प्रमुख शिखरे दिली आहेत त्यांची राज्यनिहाय योग्य जोड्या लावा.**

| | **शिखर** | | **राज्य / केंद्रशासित प्रदेश** |
|---|---|---|---|
| अ) | सारामती | i) | मध्यप्रदेश |
| ब) | धुपगड | ii) | तामिळनाडू |
| क) | गुरुशिखर | iii) | नागालँड |
| ड) | दोडाबेट्टा | iv) | राजस्थान |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | iii | i | iv | ii |
| 2) | iv | I | iii | ii |
| 3) | ii | iv | i | iii |
| 4) | i | iii | iv | ii |

78 **क्षेत्रफळानुसार नदीखोऱ्याचा उतरता क्रम लावा.**

(अ) गोदावरी खोरे (ब) महानदी खोरे

(क) कावेरी खोरे (ड) गंगा नदी खोरे

(इ) कृष्णा खोरे (उ) नर्मदा खोरे

**पर्यायी उत्तरे :**

1) पर्याय इ, उ, अ, क, ड आणि ब
2) पर्याय ब, क, अ, उ, इ, आणि ड
3) पर्याय ड, अ, इ, ब, उ आणि क
4) पर्याय अ, ब, क, ड, इ आणि उ

79 **'जांभी मृदा' याबाबत सत्य विधान / ने ओळखा.**

(अ) जांभी मृदेत चुना आणि सिलिकाचे प्रमाण सर्वात जास्त असते.

(ब) 2000 मिमीपेक्षा अति जास्त पावसाच्या प्रदेशात जांभी मृदा आढळते.

(क) तांबड फॉस्फरस, कॅल्शिअम, आणि आयोडिनचे प्रमाण अधिक असल्याने जांभी मृदा लाल रंगाची असते.

(ड) द. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि आसाम या राज्यांच्या डोंगराळ भागात जांभी मृदा आढळते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ब आणि क विधाने योग्य आहेत.
2) फक्त अ आणि ड विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ, ब आणि ड विधाने योग्य आहेत.
4) फक्त ब आणि ड विधाने योग्य आहेत.

80 **भारतात 1864 साली 'इंपिरियल फॉरेस्ट डिपार्टमेंटची' स्थापना झाली असून पहिले वन महानिरिक्षक कोण बनले होते ?**

1) डॉ. डिट्रिक ब्रांडिश 2) जुडे शेखर
3) हरि सिंग 4) जेम्स अबॉट

81 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) बॉक्साईट पासून अॅल्यूमिनिअम हा धातू बनला जातो.

(ब) अॅल्युमिनिअमचा उपयोग मोटारीचे सुटे भाग, भांडी, विमाने आणि जहाज इत्यादी उद्योगांत करतात.

(क) भारतात अल्युमिनिअमची निर्यात पन्नास टक्क्याहून जास्त होते.

(ड) झारखंड मधील 'मुरी' या ठिकाणी भारतातील पहिला अॅल्युमिनियम निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आला.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ , ब आणि क विधाने योग्य आहेत.
2) फक्त अ आणि ड विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ , ब आणि ड विधाने योग्य आहेत.
4) वरीलपैकी सर्व

82 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 7 जुलै 1854 रोजी कावसजी नानाभॉय दावर यांनी 'बॉम्बे स्पिनिंग अॅण्ड विव्हिंग कंपनी' ही भारतातील पहिली कापड गिरणी मुंबंत 'ताडदेव' येथे सुरु केली होती.

(ब) सन 1861 झाली रणछोडलाल छोटालाल यांनी अहमदाबाद येथे शहापूर मिल सुरु केली होती.

(क) राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात 'सुती वस्त्रोद्योगांचा वाटा 14 टक्के इतका आहे.

(ड) भारतातील 'सुरत' शहरास 'भारताचे कॉटनोपोलिस' असे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ, ब आणि ड योग्य आहेत. 2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.
3) फक्त विधाने अ, ब आणि क योग्य आहेत. 4) फक्त विधाने अ, क आणि ड योग्य आहेत.

83 **'भारतीय हवाई वाहतुक' याबाबत विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) भारतात नागरी हवाई वाहतुक खात्याची स्थापना सन 1927 साली झाली होती.

(ब) भारत आंतरराष्ट्रीय नागरी वाहतुक संघटनेचा सदस्य नाही.

(क) भारतात विमान निर्मिती उद्योगास सर्वप्रथम 1940 च्या दरम्यान कर्नाटकातील बंगळूर येथे सुरुवात झाली.

(ड) भारतीय विमानतळ प्राधिकरण (Airports Authority of India) ची स्थापना 1 एप्रिल 1995 साली झाली असून मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान अ, क आणि ड योग्य आहेत.
2) फक्त विधान अ आणि ड योग्य आहेत.
3) फक्त विधान अ, ब आणि ड योग्य आहेत.
4) वरीलपैकी सर्व

84 **भारताची जनगणना सन 2011 च्या बाबतीत काय असत्य आहे?**

(अ) सन 2011 ची जनगणना ही भारताच्या स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे.
(ब) सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येचे प्रमाण एकूण जागतिक लोकसंख्येशी 19.50 % इतके आहे.
(क) सन 2011 च्या जनगणनेनुसार सर्वाधिक नागरी लोकसंख्या तामिळनाडू या राज्यात असून शेकडा प्रमाण 45.52 % इतके आहे.
(ड) सन 2011 च्या जनगणेनुसार सर्वाधिक ग्रामीण लोकसंख्या असलेले राज्य उत्तरप्रदेश असुन 15.5 कोटी इतकी लोकसंख्या आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ, ब आणि ड असत्य आहेत.
2) फक्त विधाने अ आणि क असत्य आहेत.
3) फक्त विधाने ब, क आणि ड असत्य आहेत.
4) फक्त विधाने अ, ब आणि क असत्य आहेत.

85 **जलविद्युत प्रकल्प आणि त्यांची मेगावॅट क्षमता याबाबत योग्य जोड्या लावा.**

| | जलविद्युत प्रकल्प | | मेगावॅट क्षमता |
|---|---|---|---|
| अ) | भिरा | i) | 150 मेगावॅट |
| ब) | खोपोली | ii) | 72 मेगावॅट |
| क) | पैठण | iii) | 12 मेगावॅट |
| ड) | वरसगाव | iv) | 51 मेगावॅट |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | ii | i | iii |
| 2) | i | ii | iii | iv |
| 3) | iii | ii | iv | i |
| 4) | ii | iii | iv | i |

86 **भारतातील नद्यांच्या अपक्षरण कार्याचे आधारभुत घटक कोणते आहेत** ?

(अ) नदीतील पाण्याचे प्रमाण
(ब) पाण्याचा वेग व सातत्य
(क) पाण्यातील गाळाचे प्रमाण व प्रकार
(ड) नदीच्या पात्रातील खडक

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ब घटक आधारभुत आहेत.
2) फक्त अ आणि ड घटक आधारभुत आहेत.
3) फक्त अ, ब आणि क घटक आधारभुत आहेत.
4) वरील सर्व

87 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) पॅसिफिक महासागराच्या पश्चिम, जपान, चीन, फिलिपाइन्स इत्यादी देशाच्या किनाऱ्या लगत निर्माण होणारी चक्री वादळे 'हरिकेन्स' या नावानी ओळखली जातात.
(ब) कॅरेबियन समुद्रात निर्माण होणारी चक्रीवादळे 'टायफून' या नावानी ओळखली जातात.
(क) 'हरिकेन्स' चक्रीवादळाच्या वेळी वाऱ्याचा वेग ताशी कमीत कमी 60 कि.मी. इतका असतो.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ , ब आणि क विधाने योग्य आहेत.
2) फक्त अ आणि क विधाने योग्य आहेत.
3) फक्त क विधान योग्य आहेत.
4) फक्त ब आणि क विधाने योग्य आहेत.



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

88 **'टुड्रा प्रदेशाचे' बारकाईने निरिक्षण करा व त्याबाबत काय अयोग्य आहे ते ओळखा.**

(अ) टुड्रा प्रदेशाचे स्थान सुमारे $65^0$ ते $90^0$ कर्कवृत्ताच्या दरम्यान आहे.

(ब) टुड्रा प्रदेशाचे हा ग्रीनलंड, उत्तर कॅनडा, युरोप, उत्तर आशिया या भागात आढळतो.

(क) टुड्रा प्रदेशात उन्हाळ्यात सरासरी $20^0$ सें. तापमान असते.

(ड) हिवाळ्यात तापमान सुमारे $30^0$ ते $40^0$ इतके असते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, क आणि ड असत्य आहे.

2) फक्त अ, ब आणि ड असत्य आहे.

3) फक्त अ आणि ड असत्य आहे.

4)वरीलपैकी सर्व

89 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) विषुववृत्तापासुन $23^0 30'$ उत्तर तसेच $23^0 30'$ दक्षिण अक्षवृत्तादरम्यानच्या भागातील सर्व ठिकाणी सूर्यकिरणे वर्षात दोन दिवस लंबरुप पडतात.

(ब) विषुववृत्त ते $66^0 33'$ उत्तर व दक्षिण अक्षवृत्ते या दरम्यान वर्षभरात 24 तासांच्या कालमर्यादेत दिवस व रात्र होतात.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान ब योग्य आहे.

2) विधान अ आणि ब दोन्ही योग्य आहेत.

3) फक्त विधान अ योग्य आहे.

4) विधान अ आणि ब दोन्ही अयोग्य आहेत.

90 **सुंदरबन किंवा गंगा - ब्रह्मपुत्रेच्या त्रिभुज प्रदेशात खालीलपैकी कोणती वने आढळतात.**

(अ) सुंद्री (ब) बांबू (क) गर्जन

**पर्यायी उत्तरे :**

1) अ आणि ब 2) ब आणि क

3) अ आणि क 4) वरील सर्व

91 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) वातावरणातील संरचनामधील तपांबराची सरासरी उंची 17 कि.मी. इतकी असते.

(ब) वातावरणात हा सर्वात वरचा स्तर असून याची उंची विषुवृत्ताजवळ 26 - 30 कि.मी. आणि ध्रुवाजवळ 16 - 20 कि.मी. इतकी असते.

(क) 'तपांबर' या स्तरामध्ये धुलिकण आणि पृथ्वीवरील 50 % बाष्प असते.

(ड) पृथ्वीच्या हवामानातील बहुतांश बदल 'तपांबर' या स्तरातच होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ, ब आणि ड

2) फक्त ड विधान योग्य आहे.

3) वरीलपैकी सर्व

4) फक्त क विधान योग्य आहे.

92 **परिसंस्थेतील 'अजैविक घटकात' खालीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश होत नाही ?**

(अ) ऊर्जा (ब) सेंद्रिय आणि असेंद्रिय संयुगे

(क) विघटक (ड) तापमान

(इ) प्राणी (उ) वनस्पती

**पर्यायी उत्तरे :**

1) क, ड, इ, आणि उ या घटकांचा समावेश करता येत नाही.

2) अ, ब आणि इ या घटकांचा समावेश करता येत नाही.

3) अ, ब, क आणि ड या घटकांचा समावेश करता येत नाही.

4) क, इ, आणि उ या घटकांचा समावेश करता येत नाही.

93 **पाणथळ परिस्थांना असणारे प्रमूख धोके याची यादी करा.**

(अ) प्राणी आणि वनस्पती संसाधनांचे अतिशोषण (ब) तणांची अनियंत्रित वाढ

(क) औद्योगिक सांडपाणी (ड) अनियंत्रित गाळसंचयन

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, आणि ड 2) अ, क आणि ड 3) वरील सर्व 4) अ आणि ब



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

94 **'स्टारफिश' हे कोणत्या प्रकारचे जीव आहेत ?**

1) पेर्जेलिक जीव    2) लोटीक जीव
3) ॲबिजल जीव    4) बेंथिक जीव

95 **'निलगिरी मॅटेन' नावाच्या प्रजाती भारतातील खालीलपैकी कोणत्या राज्यात सापडतात.**

(अ) कर्नाटक    (ब) आंध्रप्रदेश    (क) केरळ
(ड) महाराष्ट्र    (इ) तामिळनाडू    (उ) गुजरात

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, क आणि इ या राज्यात सापडतात.
2) फक्त अ, ब,क आणि इ या राज्यात सापडतात.
3) फक्त अ, क आणि ड, इ या राज्यात सापडतात.
4) फक्त अ, ब, क, इ आणि उ या राज्यात सापडतात.

96 **हिम बिबट्या प्रकल्पासाठी भारतात प्रमूख तीन कोणते प्रदेश निवडण्यात आले आहेत ?**

(अ) हेमीस - स्पिती (लडाख व हिमाचल प्रदेश)
(ब) नंदा देवी - गंगोत्री (उत्तराखंड)
(क) कळसुबाई - त्रिबंकेश्वर (महाराष्ट्र)
(ड) कांचनगंगा, सिक्किम व अरुणाचल प्रदेश

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ड पर्याय योग्य
2) फक्त अ, ब आणि क पर्याय योग्य
3) फक्त अ, ब आणि ड पर्याय योग्य
4) वरील सर्व

97 **महाराष्ट्र राज्यात 'फुल पाखराचे गाव' म्हणून कोणत्या गावाची ख्याती आहे ?**

1) पारपोली    2) पारनेर    3) खंडाळा    4) शिवापूरी

98 **Global Fuel Economy Initiative च्या अहवालानुसार ------- पर्यंत जगभरातील वाहन इंधन कार्यक्षमता 50 % ने वाढविणे हे उद्दिष्टे ठेवले आहे.**

1) 2045 पर्यंत    2) 2030 पर्यंत
3) 2060 पर्यंत    4) 2050 पर्यंत

99 **पर्यावरणासाठी आप्पिको चळवळ कोणत्या राज्यात 1983 साली सुरु करण्यात आली आहे ?**

1) राजस्थान    2) केरळ    3) कर्नाटक    4) तामिळनाडू

100 **जलप्रदुषके यामध्ये असेंद्रिय पदार्थाचे स्त्रोत खालीलपैकी कोणते आहेत ?**

(अ) क्लोरीन    (ब) फॉस्फेट्रस
(क) नायट्रेट्रस    (ड) धातू

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ, ब आणि ड स्त्रोत आहेत.
2) फक्त अ, ब आणि क स्त्रोत आहेत.
3) वरील सर्व
4) फक्त ब आणि क स्त्रोत आहेत.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

## सूचना माहितीस्तव - (पृष्ठ 1 वरून पुढे ........)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यक्तिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदारवर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम - 82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ सपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न (माहितीस्तव)

प्र. क्र. 101. **'गुलामगिरी' हे पुस्तक कोणी लिहले आहे ?**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर    2) गो.ग. आगरकर

3) महात्मा फुले    4) राजा राममोहन रॉय

ह्या प्रश्नाचे उत्तर "(3) महात्मा फुले " असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 101. ① ② ● ④

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुसस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर - क्रमांक तुम्हाला स्वतंत्र्यरीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्यात त्या प्रश्नपक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट नागपूर

अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

SPANDAN Career Institute The way of Success. Since 2008

UPSC /MPSC /BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

2023

Code : YO4

## राज्यसेवा (MPSC) पूर्व सराव परीक्षा

सामान्य अध्ययन चाचणी (GS-1)

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 100

Paper No. 04

एकूण गुण : 200

### Paper No – 04 (Ans Key)

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 26 | 4 | 51 | 3 | 76 | 2 |
| 2 | 4 | 27 | 3 | 52 | 4 | 77 | 1 |
| 3 | 3 | 28 | 4 | 53 | 2 | 78 | 3 |
| 4 | 1 | 29 | 2 | 54 | 1 | 79 | 4 |
| 5 | 4 | 30 | 3 | 55 | 3 | 80 | 1 |
| 6 | 3 | 31 | 4 | 56 | 2 | 81 | 3 |
| 7 | 3 | 32 | 1 | 57 | 1 | 82 | 3 |
| 8 | 1 | 33 | 1 | 58 | 3 | 83 | 1 |
| 9 | 2 | 34 | 3 | 59 | 4 | 84 | 4 |
| 10 | 3 | 35 | 2 | 60 | 3 | 85 | 2 |
| 11 | 1 | 36 | 4 | 61 | 2 | 86 | 4 |
| 12 | 3 | 37 | 4 | 62 | 3 | 87 | 3 |
| 13 | 1 | 38 | 2 | 63 | 3 | 88 | 1 |
| 14 | 2 | 39 | 3 | 64 | 4 | 89 | 2 |
| 15 | 2 | 40 | 4 | 65 | 1 | 90 | 4 |
| 16 | 3 | 41 | 4 | 66 | 1 | 91 | 2 |
| 17 | 2 | 42 | 2 | 67 | 4 | 92 | 4 |
| 18 | 4 | 43 | 1 | 68 | 3 | 93 | 3 |
| 19 | 1 | 44 | 4 | 69 | 1 | 94 | 4 |
| 20 | 2 | 45 | 1 | 70 | 3 | 95 | 1 |
| 21 | 1 | 46 | 2 | 71 | 1 | 96 | 3 |
| 22 | 3 | 47 | 4 | 72 | 1 | 97 | 1 |
| 23 | 3 | 48 | 1 | 73 | 2 | 98 | 4 |
| 24 | 2 | 49 | 3 | 74 | 4 | 99 | 3 |
| 25 | 3 | 50 | 2 | 75 | 4 | 100 | 2 |

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर